| | |
|---|---|
| | **नियमित फौजदारी खटला क्र. ४३/२०२४ मधील**<br>**नि. १८ खालील आदेश**<br>**(CNR No.MHRT080003742024)** |

| | |
|---|---|
| **सौ. हर्षा सुनिल सुर्वे तर्फे मुखत्यार –**<br>**श्री. सुनिल भार्गव सुर्वे,**<br>**वय** – ४३ **वर्षे**, **व्यवसाय** – नोकरी,<br>**राहणार** – १००४, १० वा मजला,<br>०७ प्लमरीया ड्राईव्ह, म्हाडा बिल्डींग, पुनावाले पुणे, | **...अर्जदार** |
| ***विरुध्द*** | |
| **महाराष्ट्र शासन करीता**<br>संगमेश्वर पोलीस निरीक्षक,<br>ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी. | **... गैरअर्जदार** |

अर्जदार **सुनिल भार्गव सुर्वे**, यांनी **भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ४९७** प्रमाणे संगमेश्वर पोलीस ठाणे गु.र.नं. ३६/२०२४ मधील जप्त अर्जदाराच्या पत्नीच्या मालकीची केटीएम डयुक कंपनीची ऑरेंज ब्लॅक रंगाची मोटारसायकल क्रमांक **एमएच–४६–एटी–२६२१** ज्याचा इंजीन क्र. **690647674** व चेसीस क्रमांक **MD2JUC4M7GC060755** (संक्षिप्ते करीता ''जप्त वाहन'') हे दुचाकी वाहन मिळविण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदाराच्या कथनानुसार दिनांक १६/०५/२०२४ रोजी रात्री ०९:०० वाजताच्या सुमारास अर्जदार व त्यांचा पुतण्या हार्दीक विकास सुर्वे असे

त्यांच्या पत्नीच्या नावे असलेली केटीएम डयुक दुचाकी गाडी क्रमांक एमएच–४६–एटी–२६२१ ही घेवुन मासे पकडण्यासाठी कुरधुंडा खाडी येथे गेले होते. जप्त वाहन हे अर्जदाराच्या पत्नीच्या मालकीचे आहे. सदरचे वाहन आर. टी. ओ. महाराष्ट्र यांच्याकडे नोंदणीकृत आहे. सदरचे वाहन संगमेश्वर पोलीस स्टेशनच्या आवारात मोकळ्या जागेत पडून आहे. ती तशीच पडून राहील्यास ती खराब होवुन वापरण्यास योग्य राहणार नाही.

**०३**. जप्त वाहन पोलीस स्टेशनकडे असल्याने त्याचा वापर अर्जदार यास कौटुंबिक अथवा व्यावसायीक कामाकरीता वापरता येत नाही. जप्त वाहन अर्जदाराच्या ताब्यात मिळाल्यास तो त्यामध्ये कोणताही बदल करणार नाही वा कोणासही तबदील करणार नाही. याउलट, ताबा न मिळाल्यास त्याचे अपरीमित असे नुकसान होणार आहे. सबब, अर्जदाराचे असे म्हणणे आले की, मे. न्यायालय ज्या अटींवर जप्त वाहन ताब्यात देण्यास आदेश देईल त्या सर्व अटी अर्जदार पाळण्यास तयार आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने दाखल केला.

**०४**. सदरच्या अर्जावर सहा. सरकारी विधीज्ञांनी मुद्देमाल योग्य त्या अटी शर्तीवर परत देण्याचे म्हणणे सादर केले.

**०५**. सदरच्या अर्जावर तपासिक अंमलदार संगमेश्वर पोलीस ठाणे यांनी देखील त्यांचे म्हणणे **निशाणी २७** खाली सादर केले. त्यांनी जप्त मुद्देमाल अर्जदाराच्या ताब्यात योग्य त्या अटी शर्तीवर देणेबाबत काहीही हरकत नाही असे नमुद केले आहे.

**०६**. **भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ४९७** अन्वये हा अर्ज निकाली काढण्यासाठी खालील महत्वाच्या गोष्टी विचारात घेणे गरजेचे आहे.

| | | |
|---|---|---|
| अर्जदाराचे नाव | :– | **सौ. हर्षा सुनिल सुर्वे तर्फे मुखत्यार – श्री. सुनिल भार्गव सुर्वे,** **वय** – ४३ **वर्षे**, **व्यवसाय** – नोकरी, |
| राहणार | :– | १००४, १० वा मजला, ०७ प्लमरीया ड्राईव्ह, म्हाडा बिल्डींग, पुनावाले पुणे, |
| वाहनाचे नाव | :– | केटीएम डयुक |
| नोंदणी क्रमांक | :– | MH-46-AT-2621 |
| चेसीस नंबर | :– | **MD2JUC4M7GC060755** |
| इंजिन नंबर | :– | 690647674 |
| ज्या गुन्हयामध्ये वाहन जप्त आहे त्याचा सी. आर. नंबर | :– | ३६/२०२४ |
| गुन्हा ज्या कलमाखाली घडला आहे ते कलम | :– | भारतीय दंड संहिता ३७९ |
| अर्जदार नोंदणीकृत मालक आहे काय? | :– | होय. |

**०७.** अर्ज व त्यावरील म्हणणे यांचे अवलोकन केले.

**०८.** दोन्ही पक्षातर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०९.** अर्जदाराने त्याच्या अर्जाच्या पुष्टयर्थ खालील कागदोपत्री पुरावे दाखल केले आहेत –

a) अर्जाचे पुष्टयर्थ प्रतिज्ञापत्र नि. १९.

b) वाहनाच्या आर. सी. बुकची प्रमाणीत प्रत.

c) सौ. हर्षा सुनिल सुर्वे यांनी श्री. सुनिल भार्गव सुर्वे यांना करुन दिलेले मुखत्यारपत्राची मूळ पत्र.

d) अर्जदाराच्या आधारकार्डची स्वसाक्षांकीत प्रत.

**१०.** सदरची दुचाकी वाहन हे पोलीसांनी प्रस्तुत गुन्हयामध्ये जप्त केल्याची बाब वादातित नाही. जप्त वाहनाच्या आरसी बूकच्या प्रतीवरुन सदरचे वाहन अर्जदार हर्षा सुर्वे यांच्या नावे असल्याचे दिसून येते. हर्षा सुर्वे यांनी सुनिल सुर्वे यांच्या नावे सदर जप्त वाहनाचा ताबा मिळण्यासाठी मुखत्यारपत्र लिहून दिल्याचे दिसून येते. जप्त वाहन हे गु.र.नं. ३६/२०२४, भारतीय दंड विधानचे कलम ३७९ सह कलम ३४ अन्वये दाखल जप्त केल्याचे दिसून येते. सदर गुन्हयाचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल झालेले आहे. गुन्हयाची संपरीक्षा संपवून न्याय निर्णय होण्यास बराच कालावधी लागणार आहे. जप्त वाहन हे पोलीस ठाण्यात पडून असल्याने अंतरीम ताबा अर्जदाराला न दिल्यास त्याचे मूल्यांकन कमी होईल व त्यामुळे कोणताही न्यायोचीत हेतू साध्य होणार नाही. त्यामुळे, सदर वाहनाचा ताबा अर्जदारातर्फे मुखत्यारधारक यांच्याकडे योग्य त्या अटी शर्तीवर देणे उचित होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे –

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करणेत येतो.

२. पोलीस निरीक्षक, संगमेश्वर पोलीस ठाणे, यांना आदेश देण्यात येतो की अर्जदाराच्या पत्नीच्या मालकीची दुचाकी केटीएम डयुक कंपनीची ऑरेंज ब्लॅक रंगाची मोटारसायकल क्रमांक एमएच–४६–एटी–२६२१ ज्याचा इंजीन क्र. **690647674** व चेसीस नं. **MD2JUC4M7GC060755** ही

अर्जदारातर्फे मुखत्यारधारक सुनिल भार्गव सुर्वे यांना रक्कम रुपये १,००,०००/- (एक लाख रुपये मात्र) चे हमीपत्र दिल्यानंतर परत देण्यात यावी.

३. तपासिक अंमलदार यांनी सदरची गाडी अर्जदारास परत करण्यापूर्वी गाडीचे चार बाजुने फोटो काढून त्याबाबत पंचनामा करावा. असा पंचनामा व फोटो त्यांचे निगेटिव्ह सह तथा योग्य त्या प्रमाणपत्रासह या न्यायालयात आदेशापासून १० दिवसाच्या आत दाखल करावे. या सर्व प्रक्रियेचा खर्च प्रस्तुत अर्जदाराने करावा.

४. अर्जदाराने जप्त मुद्देमाल ताब्यात मिळाल्यानंतर या केसच्या अंतिम निकालापर्यंत ते कोणालाही विकु नये अथवा त्यामध्ये कोणताही बदल करु नये.

५. अर्जदाराने सदरच्या वाहनाचा रंग अथवा नंबर प्लेट मध्ये बदल करु नये.

६. अर्जदाराने सदरचा मुद्देमाल मे. न्यायालयास जेव्हा-जेव्हा चौकशीकामी आवश्यकता असेल तेव्हा-तेव्हा मे. न्यायालयात स्वखर्चाने हजर करावेत.

७. वाहनाचा सुपुर्तनामा अर्जदाराने तपासिक अंमलदाराच्या समोर कार्यान्वीत करावा व त्याची कॉपी या न्यायालयात चार्जशिटसोबत दाखल करावी.

८. वरील विषयास अनुसरुन संबंधीत पोलीस ठाण्यास पत्र पाठवावे.

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.06.16 16:15:36 +0530

**स्थळ – देवरुख.** **(श्रीमती आर. आर. कुलकर्णी)**

**दि. १६/०६/२०२५** **न्यायदंडाधिकारी वर्ग १, देवरुख.**

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence. | | |
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 16/06/2025 |
| Order signed by the presiding officer on | : | 16/06/2025 |
| Order uploaded on | : | 16/06/2025 |